# महाराष्ट्र राज्य
# मानवी हक्क आयोग

२०२१-२०२२

# २१ वा वार्षिक अहवाल
## १ एप्रिल, २०२१ ते ३१ मार्च, २०२२

**अहवालाबद्दल**

या अहवालामध्ये राज्यामधील मानवी हक्कांचे सर्वसमावेशक विहंगावलोकन केले आहे. त्यामध्ये मानवी हक्काच्या आयोगाच्या उल्लंघनाच्य बाबींचा व त्याबाबतीतील सुधारणा करण्यासाठी केलेल्या, शिफारसी यांचा समावेश आहे. हा अहवाल आयोगाने केलेल अन्वेषण व काढलेले निष्कर्ष यावर तसेच नागरी सामाजिक संस्थांकडून व अन्य यांच्याकडून आलेल्या निविष्ठा (इनपुट्स) यांवर आधारलेले आहे.

21 वा वार्षिक अहवाल 2021-22

# महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग

# 21 वा वार्षिक अहवाल

# 2021-22

9, हजारीमल सोमाणी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर, मुंबई, महाराष्ट्र 400 001

# प्रस्तावना

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचा हा 21 वा वार्षिक अहवाल आहे.

मानवी हक्क म्हणजे सर्व मानवांचे अनन्य संक्राम्य असलेले मूलभूत हक्क असे सर्वसामान्यपणे समजले जाते. मानवी हक्क हे देश, स्थान, भाषा, धर्म, मानववंशीय उद्‌गम, लिंग, जात, जमात इत्यादींच्या पलीकडे सार्वत्रिक अशा स्वरुपाचे आहेत. राष्ट्रसंघाच्या (यूनो) परिषदांनुसार व संकेतांनुसार 1948 साली केलेल्या मानवी हक्काच्या सार्वत्रिक घोषणांमध्ये भर दिल्यानुसार कोणत्याही देशामध्ये कोणतीही राजकीय, आर्थिक किंवा सांस्कृतिक पद्‌धती अंमलात असली तरीही सर्व मानवी हक्कांचे संरक्षण करणे व त्यांना प्रोत्साहन देणे हे त्या-त्या राज्याचे कर्तव्य आहे. त्यानुसार भारतामधे मानवी हक्क संरक्षण अधिनियम, 1993 अस्तित्वात आला.

या अधिनियमाचे उद्‌दिष्ट सीमित असले, म्हणजेच मानवी हक्क आयोग हा केवळ सार्वजनिक सेवकांनी केलेल्या मानवी हक्कांच्या उल्लंघनाचीच चौकशी करु शकतो आणि केवळ शिफारस करणारे आदेशच जारी करु शकतो तरीही महाराष्ट्र मानवी हक्क आयोगाने त्यांचे मर्यादित अधिकार व मर्यादित अधिकार क्षेत्र यामध्येही आयोगाला प्राप्त झालेल्या मानवी हक्क अधिकारांच्या उल्लंघनाच्या तक्रारींची चौकशी करणे व स्वत:हून पुढाकार घेऊन चौकशी करणे याद्‌वारे सार्वजनिक सेवकांनी केलेल्या मानवी हक्काच्या उल्लंघनामध्ये लक्ष घातले आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये जागरुकता आणण्यासाठी महाराष्ट्र राज्याने केलेल्या प्रयत्नांचे फळ म्हणून मोठ्या संख्येने तक्रारी प्राप्त झाल्या व त्यांची चौकशी करण्यात आली. तसेच आयोग अचानक तपासण्या करते व विविध जिल्हयांमध्ये शिबीर बैठका घेते. कोविड-19 महामारीच्या दरम्यान आयोगाने महाराष्ट्र राज्यातील लोकांच्या मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी केलेल्या प्रयत्नाची हा अहवाल साक्ष देतो. महामारीच्या काळात टाळेबंदी जाहीर झाल्यामुळे हा अहवाल 2022 साली विधानसभेत सादर करता आला नाही, त्यामुळे हा अहवाल पुढच्या वर्षी सादर केला जात आहे. या अहवालामध्ये आयोगाने केलेल्या कामाचे सविस्तर वर्णन आहे.

हा अहवाल कायदेशीर हक्क व संविधानिक शासन यांची शाळा, टाटा इन्स्टिटट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांच्या एल.एल.एम (मास्टर्स ऑफ लॉ) च्या विद्‌यार्थ्यांच्या मदतीने महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाशी संलग्नक कार्यक्रमांतर्गत तयार केला आहे.

18-1-2024

न्यायमूर्ती के.के. तातेड (सेवानिवृत्त)

(अध्यक्ष)

M. A. SAYEED

(एम.ए. सईद)

सदस्य

(भगवान डी. मोरे)

सदस्य

दि.08.04.2023 रोजी (म.नं.) सेवानिवृत्त झाले.

**महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई यांच्या अध्यक्षांकडून संदेश**

संयुक्त राष्ट्र संघाने मानवी हक्काची घोषणा केली त्याचा 75 वा वर्धापन दिन व मानवी हक्काची सर्व जगात विशेषत: भारत आणि महाराष्ट्रात अंमलबजावणी होणे ही फार महत्त्वाची गोष्ट आहे सातत्याने होऊ शकणाऱ्या विकास लक्ष्य (एसडीजी) यांचे 16 वे अभियान यांचे विधान असे आहे "सातत्यपूर्ण विकास होण्यासाठी सर्वसमावेशक व शांततापूर्ण समाजाचा प्रसार व प्रचार करणे, न्याय मिळण्यासाठी सर्वांना खात्रीशीर मार्ग पुरवणे आणि सर्व स्तरांवर परिणामकारक, जबाबदार आणि सर्वसमावेशक संस्था निर्माण करणे". महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाने पॅरिस तत्त्वे ही मानवी हक्कांची आंतरराष्ट्रीय मानके एकत्रित केली आहेत. महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग राज्य सरकार आणि नागरी समाज यांच्यातील दुवा आहे. महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग तक्रारी प्राप्त करतो, हाताळतो आणि हक्कांवर आधारित वैधानिक चौकट निर्माण करण्यासाठी शासनाला सल्ला देतो, असमानता आणि भेदभाव यांच्याविरुद्ध महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग लढा देत आहे. जनतेच्या ज्या सदस्यांना कलह सोडवणे आवश्यक असते त्यांना आयोगाकडे सहज जाता येते. जे आयोगाचा दरवाजा ठोठावतात त्यांना फायदा होतो. मानवी हक्क भंगाची तक्रार हाताळण्याची उत्तम यंत्रणा तंत्रज्ञानाचा वापर करते, खंड न पडता नियमित सुनावणी घेते व त्वरीत न्याय देते. शारीरिक किंवा सामाजिकदृष्टीने ज्या महिला अडचणीच्या स्थितीत आहेत त्यांना न्याय नाकारला जात नाही. गेल्या 20 वर्षांत महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाने महाराष्ट्रातील जनतेच्या सन्मानाने व प्रतिष्ठेने जगण्याची आकांक्षा पूर्ण करण्यासाठी अथक परिश्रम केले. शासनाचे कार्य सर्व स्तरावर मानवी हक्कावर आधारित चालावे यासाठी आयोगाने सर्व स्तरावर सतत प्रयत्न केले. त्यामध्ये राज्य स्तर, जिल्हा स्तर आणि दूर असलेल्या खेड्यांच्या स्तरावर केलेल्या प्रयत्नाचा समावेश होतो. जनतेचे मानवी हक्कांबाबत असे ज्ञान वाढवण्यासाठी व त्यांना मानवी प्रतिष्ठा वाढवण्यासाठी संवेदनशील करण्यासाठी आयोग प्रयत्न करीत आहे. .

**- मा. न्यायमूर्ती के.के. तातेड (निवृत्त), अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई.**

## **महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई यांच्या सदस्यांकडून संदेश**

मानवी हक्कांच्या सार्वत्रिक घोषणेचे दिलेले आश्वासन - प्रतिष्ठा व समान हक्क यांची पूर्तता महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगामध्ये झाली आहे. मानवी हक्कांच्या सार्वत्रिक घोषणेमध्ये निहित (enshrined) केलेली मूल्ये व हक्क ही आमच्या एकत्रित कृतींसाठी स्थिरचिन्ह (बेंचमार्क) आहेत. त्यामुळे जेव्हा समाजाला स्फोटक असमानता व पर्यावरणातील बदलासारख्या समस्या भेडसावतात तेव्हा "मानवी हक्कांसाठी उभे राहा" या संदेशानुसार आम्ही केलेल्या सामायिक कार्यामुळे कोणीही मागे रहात नाही. माध्यमातून आलेले अहवाल व तक्रारी यांची आयोग स्वत:हून दखल घेतो व त्याद्वारे नागरी व राजकीय हक्कांच्या बाबतीत आयोग लक्ष घालतो. याच बरोबर आयोग आपले लक्ष अनुसूचित जाती / जमातीचे सदस्य तसेच अन्य असुरक्षित (vulnerable) गट जसे महिला, मुले, अपंग व्यक्ती व वृद्ध व्यक्ती यांच्या मानवी हक्कांवरही केंद्रित करीत आहे. त्याचप्रमाणे मानवी हक्क अधिनियमानुसार आलेल्या जबाबदाऱ्या व प्राप्त झालेल्या आदेशानुसार प्रशिक्षण देणे व जागृती करणे हे कार्य करीत आहे.

**- मा. श्री. एम.ए. सईद, सदस्य, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई**

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग हे मानवी हक्कांची वकिली करण्यासाठी मदत करणारे प्रादेशिक खंडपीठ आहे. महाराष्ट्रामध्ये आयोगाने आदेशाची अंमलबजावणी करणे व परिवर्तनात्मक न्यायाची हमी देणे यामध्ये परिणामकारकता व कार्यक्षमता दाखवली. कायद्याच्या नियमाला उचलून धरण्यासाठी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग मूलभूत तत्वे व मूल्ये यावर विश्वास आणि न्याय याच्याशी तडजोड करीत नाही. शासनाच्या सर्व स्तरावर मानवी हक्क एकत्रित होतील व शासकीय अधिकारी व नागरी समाजाचे मानवी हक्कांच्या बाबतीतील संवेदनशीलता व त्याबाबतीतील समज वाढवणे यासाठी आयोग परिश्रमपूर्वक काम करीत आहे. आयोग इच्छूक वकिलांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम चालवतो तसेच सामाजिक गरजा सुनिश्चित करताना परित्यक्त झालेल्या व संकटात सापडलेल्या महिलांना सक्षम बनवतो.

**- मा. श्री. भगवंत डी मोरे, सदस्य, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई**

## अनुक्रमणिका


| अनुक्रमांक | प्रकरण | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| 1. | परिचय | १ |
| 2. | आयोगाने हाताळलेल्या तक्रारी | ७ |
| 3. | उदाहरणादाखल खटले | १४ |
| 4. | आयोगाने घेतलेल्या भेटी | २३ |
| 5. | जागरूकता कार्यक्रम | २५ |
| 6. | शिफारसी | २६ |
| 7. | अंदाजपत्रके आणि वित्त | ३० |

## प्रकरण 1

## प्रस्तावना

"लोकांना त्यांचे मानवी हक्क नाकारणे म्हणजे त्यांच्या मानवतेला आव्हान देणे"

- नेल्सन मंडेला

अभिलेख उपलब्ध असलेल्या इतिहासाच्या सुरुवातीपासून मानव आपल्या अस्तित्वासाठी लढत आहे. बलवान व्यक्ती दुबळ्या व्यक्तींपेक्षा अधिक उत्तरजीवी होण्याच्या कल्पनेमुळे लोकांमध्ये झगडे होऊ लागले व त्यामुळे दुबळ्यांचे संरक्षण करण्यासाठी कायदे व नियम तयार करण्यासाठी मार्ग प्रशस्त झाला. भूतकाळामध्ये मानवी हक्कांसाठी जागाच नव्हती कारण व्यक्ती व्यक्ती व्यक्तींमधील संबंधाचे संरक्षण आपोआपच करीत होत्या. मानवी हक्कांची कल्पना आता निर्माण झाली आहे व राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक शतकानंतर त्याला आता महत्व मिळाले आहे. लोकांना वैयक्तिक किंवा सामूहिकरीत्या असलेले असे स्वातंत्र्य की ज्यामुळे आयुष्याची गुणवत्ता वाढवणे व काही मूल्य असल्याची भावना वाढवणे शक्य होते.

1948 साली संयुक्त राष्ट्रांनी एक मानवी हक्कांची सार्वत्रिक घोषणा केली. त्यामध्ये अनेक हक्कांचा समावेश आहे व ते सर्व व्यक्तींना कोणताही भेदभाव न करता लागू पडतात. प्रत्येक राज्याने या हक्कांची खात्री दिली पाहिजे व त्यांचे संरक्षण केली पाहिजे. या घोषणेला प्रतिसाद म्हणून 1966 साली नागरी व राजकीय हक्क, सामाजिक व सांस्कृतिक हक्क यावरील दोन करारांवर (convenants) स्वाक्षरी केली. या आंतरराष्ट्रीय करारांनुसार अगदी आणीबाणीच्या काळातही काही हक्कांवर बंधने आणता येत नाहीत किंवा ती स्थगित करता येत नाहीत. या हक्कांमध्ये जगण्याचा हक्क समाविष्ट आहे. त्यामध्ये उचित स्तरावर जीवन जगणे याचा हक्क, शिक्षण मिळवण्याचा हक्क, काम करण्याचा हक्क, समान कामासाठी समान मोबदला मिळण्याचा हक्क तसेच अल्पसंख्यांक व्यक्तींना त्यांची संस्कृती, धर्म व भाषा जपण्याचा हक्क यांचा समावेश हातो. नागरी व राजकीय हक्काच्या करारां मध्ये सर्व तऱ्हेचा वर्णभेद टाळणे हे अंतर्भूत आहे, तसेच जात, धर्म, रंग, लिंग, भाषा, सामाजिक उद्‌गम या आधारावर भेदाभेद होण्यापासून मुक्त असे मूलभूत मानवी हक्क उपोभगण्याचे स्वातंत्र्य प्रत्येकाला आहे.

संयुक्त राष्ट्रसंघ काही साधनांद्वारे तसेच अन्य विभागीय व आंतरराष्ट्रीय संस्थांच्या माध्यमातून व मुक्त मानवी हक्कांचा प्रसार / प्रचार करणे, त्यांना उत्तेजन देणे, त्यांचे रक्षण करणे व त्यांना उचलून धरणे यासाठी काम करते. ही साधने म्हणजे संयुक्त राष्ट्राच्या सदस्यांनी त्यांचे घरगुती (अंतर्गत) कायदे आंतरराष्ट्रीय नैतिक संहितेबरोबर जुळवून घेणे. हा मूळ विचार मनात घेऊन संयुक्त राष्ट्रसंघाने 1991 साली प्रायोजित केलेल्या राष्ट्रीय संस्थेच्या प्रतिनिधींच्या पॅरिस येथे झालेल्या बैठकीत "पॅरिस तत्वांचा" विकास केला गेला. या तत्वावर संयुक्त राष्ट्र संघाच्या मानवी हक्क आयोगाने मार्च 3, 1992 रोजी शिक्कामोर्तब केले व संयुक्त राष्ट्र संघाच्या सर्वसाधारण सभेने डिसेंबर 20, 1993 रोजी त्यावर शिक्कामोर्तब केले.

ही तत्वे सर्व जगामध्ये राष्ट्रीय मानवी हक्क संस्था निर्माण करणे व त्यांचे व्यस्थापन करणे यासाठी मैलाचा दगड व मार्गदर्शक तत्वे झाली. ज्या मानवाच्या किमान कायदेशीर करारांचे उल्लंघन ज्या कृती करतात त्यांच्यासाठी लोकांचे सार्वत्रिक कायदेशीररीत्या संरक्षण करतात ही मार्गदर्शक तत्वे म्हणजे मानवी हक्क. नायमूर्ती व्ही. आर. कृष्ण अय्यर म्हणतात की “मानवी हक्क हे मानव जातीच्या प्रत्येक सदस्याला असलेले व कमी न होणारे हक्क आहेत की जे सदस्य सरकार किंवा अन्य सार्वजनिक अधिकारी किंवा गट किंवा टोळ्या आणि अन्य दडपशाही करणाऱ्यांविरुद्ध उपलब्ध आहेत.


भारताने दोन्ही करारनामे 1979 साली मंजूर केले व भारताने सार्वत्रिक मानवी हक्कांच्या घोषणेवर स्वाक्षरी केली. आंतरराष्ट्रीय मानवी हक्क कायदा व भारताचे संविधान यांची तुलना केल्यावर असे दिसून येईल की बहुतेक मानवी हक्क घटनांच्या तिसऱ्या परिशिष्टामध्ये मूलभूत म्हणून समाविष्ट झाले आहेत व न्यायालयांनी ते उचलून धरले आहेत. न्यायाचे प्रशासन करणे व मानवी हक्कांचे संरक्षण करणे यामध्ये मोकळेपणा, जबाबदारी यामध्ये सुधारणा करण्यासाठी एखादा स्वतंत्र मंच निर्माण करणे हे महत्वाचे आहे असे मानले गेले. सप्टेंबर, 1993 मध्ये भारताच्या राष्ट्रपतींनी मानवी हक्क संरक्षणाचा अध्यादेश जारी केला व ऑक्टोबर 12, 1992 रोजी राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाची स्थापना झाली. सदर विधेयक लोकसभेत पारित झाल्यावर त्याचे कायद्यात रुपांतर झाले व हा कायदा 8 जानेवारी, 1994 पासून लागू झाला. या कायद्यानुसार राष्टीय मानवी हक्क आयोग, राज्य मानवी हक्क आयोग, जिल्हा मानवी हक्क आयोग यांची स्थापना आंतरराष्ट्रीय मानवी हक्क आयोग यांची स्थापना आंतरराष्ट्रीय करार आणि मानवी हक्क संरक्षण कायदा, 1993 नुसार करायची आहे.

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाची स्थापना 6 मार्च, 2001 साली झाली जेव्हा महाराष्ट्राच्या माननीय राज्यपाल यांनी मानवी हक्क संरक्षण कायदा, 1993 च्या कलम 22 नुसार आयोगाचे अध्यक्ष आणि तीन सदस्यांच्या नेमणुकीच्या आदेशांवर स्वाक्षऱ्या केल्या.

**<u>आयोगाची रचना</u>**

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग (एमएसएचआरसी) ही एक स्वायत्त आणि वैधानिक संस्था आहे. त्याची रचना खालीलप्रमाणे -

- जी व्यक्ती एखाद्या उच्च न्यायालयाची मुख्य न्यायाधीश किंवा न्यायाधीश होती अशी व्यक्ती आयोगाची अध्यक्ष असेल.
- अशी व्यक्ती की जी उच्च न्यायालयाची न्यायाधीश होती किंवा आहे किंवा राज्यातील जिल्हा न्यायालयामध्ये न्यायाधीश होती किंवा आहे आणि त्या व्यक्तीला जिल्हा न्यायाधीश म्हणून किमान सात वर्षे अनुभव आहे, अशी व्यक्ती आयोगाची सदस्य असेल.
- अशा व्यक्तीला आयोगाचा सदस्य नेमला जाईल की ज्या व्यक्तीला मानवी हक्कासंबंधित बाबींच्या संबंधित व्यावहारिक अनुभव असेल किंवा मानवी हक्कासंबंधित बाबींचे ज्ञान असेल.




**महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबईची रचना.**

- ❖ न्यायमूर्ती के.के. तातेड (निवृत्त), माननीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई.
- ❖ श्री. एम.ए. सईद, माननीय सदस्य, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई.
- ❖ श्री. भगवंतराव डी. मोरे, माननीय सदस्य, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई.
- ❖ श्री. तुकाराम मुंढे, (भा.प्र.से.), सचिव, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई.
- ❖ श्री. सचिन पांडकर, पोलीस अधीक्षक आणि आय.सी. विशेष पोलीस महानिरीक्षक महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई.
- ❖ श्री. प्रमोद भगवान लोखंडे, प्रबंधक, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई.

**2. आयोगाचे कार्य**

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग ही भारतात स्थापन केलेली एक महत्त्वाची संस्था आहे. त्याचा उद्देश पूर्ण राज्यभर मानवी हक्कांचे संरक्षण करणे आणि त्यांचा प्रसार व प्रचार करणे हा आहे. आयोगाची काही कार्ये पुढीलप्रमाणे आहेत.

1. **मानवी हक्क भंगाच्या तक्रारींचे अन्वेषण करणे -** राज्यामध्ये मानवी हक्क भंग झाला असल्याच्या तक्रारींमध्ये चौकशी करण्याचा अधिकार महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाला आहे. मानवी हक्क भंग झाला आणि त्याची तक्रार झाली असल्यास सदर चौकशी करता येईल. तसेच आयोग स्वत:हून अशा घटनांमध्ये चौकशी करील व संबंधित प्राधिकरणांना उचित शिफारसी करील.
2. **मानवी हक्क भंगाच्या घटनांची चौकशी करणे -** महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग मानवी हक्क भंगाच्या घटनांमध्ये चौकशी करु शकतो, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग अशा घटनांचे स्वत:हून चौकशी करील आणि संबंधित अधिकाऱ्यांना योग्य कारवाईची शिफारस करील.
3. **नुकसान भरपाई आणि मदतीची शिफारस करणे -** मानवी हक्क भंगाच्या घटनांमध्ये महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग पीडित व्यक्तीला **नुकसान भरपाई** देण्याची किंवा पीडिताच्या कुटुंबाला मदत करण्याची शिफारस करू शकतो.
4. **मानवी हक्क भंगाच्या घटना होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक कृती करणे -** मानवी हक्क भंगाच्या घटना होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक कृती करणे यासाठी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग राज्य सरकार व अन्य प्राधिकरणांना शिफारसी करू शकतो.
5. **मानवी हक्कांबाबत शिक्षण आणि मानवी हक्कांबाबतची जागरुकता -** महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग विविध मार्गाने मानवी हक्क शिक्षण आणि मानवी हक्काबाबतची जागरूकता करण्यासाठी शिफारसी करु शकेल. जसे कार्यशाळा, चर्चासत्रे व जनतेसाठी व्याख्याने आयोजित करणे.
6. **शासकीय संस्थांच्या कार्यावर देखरेख ठेवणे -** शासकीय संस्थांचे कामकाज मानवी हक्कांच्या मानकानुसार चालत आहे की नाही यावर देखरेख ठेवणे.
7. **राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाला अहवाल सादर करणे -** राज्यामध्ये मानवी हक्कांची परिणामकारकरीत्या अंमलबजावणी करण्यासाठी विविध उपायांबाबत अहवाल सादर करणे.

मानवी हक्क संरक्षण कायदा, 1993 च्या कलम 28(1) नुसार राज्य आयोग राज्य सरकारला वार्षिक अहवाल सादर करील. तसेच महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाच्या मते जर अशा काही महत्वाच्या बाबी असतील की, त्या वार्षिक अहवालापर्यंत ढकलता येत नाहीत त्या बाबतीत केव्हाही अहवाल सादर करतील. सदर कायद्याच्या कलम 28 (2) नुसार राज्य सरकार महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे वार्षिक अहवाल

तसेच इतर विशेष अहवाल राज्याच्या विधान सभेत व विधान परिषदेत सादर करील (किंवा त्या राज्यात फक्त विधान सभा असेल तर फक्त विधान सभेत). तसेच त्याबरोबर राज्य मानवी आयोगाच्या शिफारसींवर राज्य सरकार कोणती कृती करणार आहे किंवा राज्य सरकाने कोणती कृती केली आहे किंवा जर राज्य सरकार महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाच्या शिफारसी स्वीकारत नसेल तर त्याची कारणे (असल्यास) नमूद केलेले एक विवरण सादर करील.

महाराष्ट्र राज्यामध्ये मानवी हक्काचे सरंक्षण करणे व राज्यात त्यांना पुढावा देणे यासाठी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग अत्यंत महत्वाचा आणि जिव्हाळ्याचा आहे. तसेच संपूर्ण देशात मानवी हक्कांची अंमलबजावणी कार्यक्षमरीत्या होण्यासाठी आयोगाची कर्तव्ये अत्यंत आवश्यक आहेत.

3. आयोगाकडे आलेल्या तक्रारी हाताळण्याची किंवा आयोगाने स्वत: कृती करण्याची पद्धती

भारतामध्ये राज्य मानवी हक्क आयोगाकडे आलेल्या तक्रारी हाताळण्याची किंवा आयोगाने स्वत: कृती करण्याची पद्धती खालीलप्रमाणे आहेत -

1. **तक्रारीची नोंदणी -** मानवी हक्कांच्या भंगाच्या तक्रारी आयोगाकडे याचिकेद्वारे करता येतील किंवा आयोग स्वत:हून अशा तक्रारीची दखल घेईल. तक्रार लेखी असली पाहिजे, त्या तक्रारीवर तक्रार करणाऱ्याची सही असली पाहिजे व त्यात घटनेचा सर्व तपशील नमूद केला पाहिजे.
2. **प्राथमिक चौकशी -** सदर तक्रार खरी आहे काय व तो आपल्या कार्यकक्षेत आहे काय हे तपासण्यासाठी आयोग तक्रारीची प्राथमिक चौकशी करेल.
3. **संबंधित पक्षकारांना नोटीस -** आयोगाला जेव्हा सदर तक्रार आपल्या कार्यकक्षेत येते याची खात्री वाटते त्यावेळी आयोग संबंधित पक्षकारांना नोटीस पाठवतील. त्यामध्ये पीडीत व्यक्ती, आरोपित, गुन्हेगार आणि अन्य कोणतेही संबंधित प्राधिकारी यांचा समावेश असेल.
4. **अन्वेषण -** आयोग स्वत:हून किंवा त्यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांमार्फत तक्रारीमध्ये अन्वेषण करील.
5. **सुनावणी -** संबंधित पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी पुरावे गोळा करणे यासाठी आयोग सुनावणी घेईल. पक्षकार आपले म्हणणे वकीलामार्फत सादर करु शकतात तसेच साक्षीदार बोलावले जाऊ शकतात.
6. **शिफारसी -** सर्व पुरावे व सादर केलेली कागदपत्रे पाहून त्यांचा विचार केल्यावर शासनासह संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक ती पाऊले उचलण्याची शिफारस आयोग करु शकेल की, ज्यामुळे भविष्यात अशा घटना होणार नाहीत व पीडीत व्यक्तीला मदत मिळेल.
7. **पाठपुरावा -** राज्य मानवी हक्क आयोग संबंधित अधिकाऱ्यांबरोबर पाठपुरावा करुन आयोगाच्या शिफारसींची अंमलबजावणी झाली की नाही व पीडीत व्यक्तीला आवश्यक ती मदत मिळाली की नाही याची खात्री करुन घेईल.

आयोग ज्यावेळी स्वत:हून कृती करते त्यावेळी माध्यमातील अहवाल, जन आक्रोश किंवा माहितीचा कोणताही अन्य स्त्रोत वापरुन मानवी हक्क भंगाच्या घटनांची आपण होऊन नोंद घेतो. अशा बाबतीत आयोगाने अवलंबण्याची पद्धती ही आयोगाला तक्रार प्राप्त झाल्यावर अवलंबण्याच्या पद्धतीसारखीच आहे.

तक्रार प्राप्त झाल्यावर आयोगाने अवलंबण्याची पद्धत स्वत: होऊन अवलंबण्याची पद्धत ही अशासाठी तयार केली आहे की, मानवी हक्क भंगाच्या घटनांकडे वेळेवर व परिणामकारकरीत्या लक्ष दिले जाईल व पीडीत व्यक्तींना आवश्यक ते सहाय्य वेळेवर मिळेल.

**4. आयोगाकडे येण्याचे फायदे**

मानवी हक्कांचे संरक्षण व प्रसार / प्रचार - महाराष्ट्र राज्यामध्ये मानवी हक्कांचे संरक्षण व्हावे व प्रसार / प्रचार व्हावा यासाठी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग जबाबदार आहे. मानवी हक्काच्या उल्लंघनाच्या तक्रारीमध्ये आयोग लक्ष घालून त्याचे अन्वेषण करु शकते व मानवी हक्कांचे अधिक उल्लंघन होऊ नये यासाठी पाऊले उचलेल.

1. **त्वरीत व कार्यक्षम निवारण -** राज्य मानवी हक्क आयोगाने मानवी हक्क भंगाच्या घटनांच्या तक्रारीमध्ये लक्ष घालून पीडितांना त्वरीत व कार्यक्षम निवारण प्रदान करावे हे राज्य मानवी हक्क आयोगाला बंधनकारक आहे.
2. **स्वतंत्र व निष्पक्ष संस्था -** राज्य मानवी हक्क आयोग ही अशी स्वतंत्र व निष्पक्ष संस्था आहे की जी शासनापासून स्वतंत्र कार्य करते. राज्य मानवी हक्क आयोग हा सर्व नागरिकांचे मानवी हक्क उचलून धरण्यासाठी जबाबदार आहे व त्याबाबतीत कोणताही भेदभाव किंवा पूर्वग्रह ठेवला जात नाही.
3. **राज्य मानवी हक्क आयोग सर्वांना उपलब्ध आहे -** राज्य मानवी हक्क आयोगाकडे कोणीही येऊ शकतो मग त्यांची आर्थिक, सामाजिक किंवा राजकीय स्थिती काहीही असो.
4. **कौशल्य आणि अनुभव -** राज्य मानवी हक्क आयोगामध्ये मानवी हक्क क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश असतो, ज्यांना मानवी हक्कांच्या गुंतागुंतीच्या समस्या हाताळण्याचे ज्ञान आणि अनुभव असतो.
5. **नुकसान भरपाई आणि मदतीची तरतूद -** राज्य मानवी हक्क आयोग मानवाधिकार उल्लंघनाच्या पीडितांना नुकसान भरपाई आणि मदतीची शिफारस करू शकतो, त्यांना अत्यंत आवश्यक आर्थिक आणि भावनिक आधार प्रदान करू शकतो.
6. **भविष्यातील उल्लंघनांचे प्रतिबंध -** भविष्यात अशा घटना पुन्हा घडणार नाहीत याची काळजी घेऊन भविष्यात होणारे मानवी हक्क उल्लंघन रोखण्यासाठी राज्य मानवी हक्क आयोग संबंधित अधिकाऱ्यांना शिफारसी करू शकतो.

### विभाग 2

### आयोगाने हाताळलेल्या तक्रारी


**1. आयोगाने 2021-22 या वर्षाकरिता हाताळलेल्या तक्रारी**


आयोगाला वर्षभरात एकूण 4012 तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. खालील चार्ट आणि तक्ता प्राप्त झालेल्या तक्रारी, प्रलंबित तक्रारी आणि निकाली काढलेल्या तक्रारींची संख्या दर्शवितो.


**दि.01.04.2021 ते 31.03.2022 पर्यंतच्या प्रकरणांचा संख्याशास्त्रीय तक्ता**

| पूर्वीचे प्रलंबित | नवीन प्राप्त | या कालावधीदरम्यान एकूण खटले | या वर्षादरम्यान निकाली काढलेले एकूण खटले | या कालावधीच्या शेवटी प्रलंबित असलेले खटले |
|---|---|---|---|---|
| 18876 | 4012 | 22888 | 591 | 22297 |

दिनांक 1 एप्रिल, 2021 ते 31 मार्च, 2022 या काळात आयोगाला प्राप्त झालेल्या व आयोगाने निकालात काढलेल्या बाबींचा संख्याशास्त्रीय तक्ता असे दर्शवतो की, या कालखंडाच्या सुरुवातीला 18,876 बाबी प्रलंबित होत्या. या काळात आयोगाला नव्या 4012 बाबी प्राप्त झाल्यावर बाबींची संख्या एकूण 22888 झाली. त्यापैकी आयोगाने 591 बाबी निकालात काढल्या व कालखंडाच्या शेवटी 22,297 बाबी प्रलंबित होत्या. या माहितीवरुन न्याय यंत्रणेला मोठ्या प्रमाणात कायदेशीर बाबी हाताळणे व संबंधित पक्षकारांना वेळेवर न्याय मिळावा यासाठी केवढ्या मोठ्या आवाहनाला तोंड द्यावे लागते हे ध्यानात येते. अधिकाऱ्यांनी बाबी प्रलंबित राहण्याचे प्रमाण कमी करण्याचे ध्यानात घ्यावे. तसेच न्याय यंत्रणेची कार्यक्षमता वाढवण्याकडे व पीडीत पक्षकारांना न्याय देण्यावर लक्ष द्यावे.






**एकूण मंजूर मदत = रु.74,00,000.00**


**2. घटनेच्या प्रकारानुसार तक्रारीची संख्या**

| **घटनांची संख्या** | **नोंदल्या गेलेल्या घटना** | **निकालात काढलेल्या घटना** |
|---|---|---|
| मुले | 61 | 4 |
| आरोग्य | 66 | 11 |
| तुरुंग | 145 | 15 |
| न्याय संस्था | 1 | 0 |
| माफिया / अंडरवर्ल्ड (गुन्हेगारांची वस्ती) | 1 | 1 |
| मजूर | 3 | 3 |
| अल्पसंख्यांक / अनुसूचित जाती / जमाती | 1 | 1 |
| पोलीस | 1339 | 180 |
| प्रदुषण / पर्यावरणशास्त्र / पर्यावरण | 8 | 0 |
| सेवा बाबी | 376 | 55 |
| महिला | 50 | 14 |
| संकीर्ण | 1961 | 307 |
| **एकूण** | **4012** | **591** |



(शा.म.मु.) वाय २६७४–५ (५५—७-२०२४)

नोंदणी केलेली प्रकरणे आणि निपटारा केलेली प्रकरणे




प्राप्त झालेल्या तक्रारी व निकालात काढलेल्या तक्रारींच्या प्रकारावरुन प्राधिकाऱ्यांना कोणत्या बाबतीत काळजी घ्यावी लागेल ते दिसून येईल. अहवालाबाबत एकूण 4012 तक्रारी प्राप्त झाल्या. त्यापैकी 591 तक्रारींचा निपटारा झाला. पोलीसांच्या बाबतीत जास्तीत जास्त तक्रारी 1339 आल्या व त्यापैकी 180 तक्रारींचा निपटारा झाला. पर्यावरणाबाबतीत सर्वात कमी तक्रारी आल्या. एकूण 8 तक्रारी नोंदल्या गेल्या व एकही तक्रारींचा निपटारा झाला नाही. संकीर्ण तक्रारी सर्वात जास्त होत्या. 1961 तक्रारी नोंदल्या गेल्या व 307 तक्रारींचा निपटारा झाला. अधिकाऱ्यांनी या क्षेत्राकडे लक्ष द्यावे न्यायदान वेळेवर व परिणामकारकरीत्या व्हावे यासाठी या क्षेत्रावर लक्ष केंद्रीत करावे.


### 3. महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाच्या न्यायालयांचा तपशील

मानवी हक्क भंगाच्या तक्रारी सोडवण्यासाठी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाची तीन न्यायालये आहेत. न्यायालय क्र.1 यावर श्री. के.के. तातेड (निवृत्त), अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई हे अध्यक्ष आहेत. न्यायालय क्र.2 यावर श्री. एम.ए. सईद, सदस्य, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई हे अध्यक्ष आहेत. न्यायालय क्र.3 यावर श्री. भगवंत डी. मोरे, सदस्य, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई हे अध्यक्ष आहेत.

पुढील तक्त्यामध्ये 2021-22 या वर्षात तीन न्यायालयांनी निकालात काढलेल्या तक्रारी अशा आहेत.

न्यायालय क्र.1, 2 व 3 मध्ये एप्रिल, 2021 ते मार्च, 2022 पर्यंत एकूण निकाली काढलेले दावे

| कालावधी | लिमिने | सुओ-मोटो | सुनावणीनंतर | शिफारसी | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एप्रिल, 2021 ते मार्च, 2022 | 444 | 24 | 600 | 6 | 1074 |





एप्रिल, 2021 ते मार्च, 2022 या काळात न्यायालय क्र.1, 2 व 3 यांनी एकूण 1074 बाबींचा निपटारा केला. त्यापैकी 444 बाबींचा निपटारा लिमिनेमध्ये झाला. 24 स्वत: होऊन (सुओ-मोटो), 600 बाबींचा निपटारा सुनावणीनंतर झाला व 6 बाबींचा निपटारा शिफारसींच्या आधारे झाला. त्यावरुन बाबी हाताळणे व न्यायदान विहित वेळेत करणे याबाबतची न्यायालयांची कार्यक्षमता दिसून येते. विविध यंत्रणांमधून बाबींचा निपटारा करण्यामधून विविध तऱ्हेच्या बाबी हाताळण्याबाबतीत न्यायालयांचे अष्टपैलुत्व (versatility) दिसून येते.

4. **जिल्हानिहाय बाबींची नोंदणी व निपटारा**

| जिल्ह्याचे नाव | नोंदणी केलेले दावे | निकाली काढलेले दावे |
|---|---|---|
| अहमदनगर | 76 | 12 |
| अकोला | 40 | 05 |
| अमरावती | 81 | 10 |
| औरंगाबाद | 114 | 17 |
| बीड | 41 | 07 |
| भंडारा | 20 | 01 |
| बुलढाणा | 80 | 11 |
| चंद्रपूर | 59 | 13 |
| धुळे | 67 | 10 |
| गडचिरोली | 23 | 03 |
| गोंदिया | 39 | 07 |
| हिंगोली | 10 | 02 |
| जळगाव | 63 | 15 |
| जालना | 42 | 08 |
| कोल्हापूर | 87 | 14 |
| लातूर | 60 | 04 |
| महाराष्ट्र | 46 | 17 |
| मुंबई | 1100 | 148 |
| नागपूर | 129 | 19 |
| नांदेड | 61 | 08 |
| नंदुरबार | 19 | 02 |
| नाशिक | 155 | 15 |
| नवी मुंबई | 120 | 12 |
| उस्मानाबाद | 34 | 05 |
| पालघर | 99 | 11 |
| परभणी | 19 | 02 |
| पुणे | 438 | 54 |
| रायगड | 86 | 17 |
| रत्नागिरी | 30 | 07 |
| सांगली | 61 | 11 |
| सातारा | 73 | 13 |
| सोलापूर | 102 | 15 |

| **जिल्ह्याचे नाव** | **नोंदणी केलेले दावे** | **निकाली काढलेले दावे** |
|---|---:|---:|
| सिंधूदुर्ग | 18 | 06 |
| ठाणे | 400 | 70 |
| वर्धा | 29 | 05 |
| वाशिम | 23 | 04 |
| यवतमाळ | 68 | 11 |
| **एकूण** | **4012** | **591** |




जिल्हानिहाय बाबींची नोंदणी व निपटारा यांच्या माहितीवरुन असे दिसून येते की, महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांमध्ये याबाबतीत मोठा फरक दिसून येतो. मुंबईमध्ये जास्तीत जास्त बाबी नोंदल्या गेल्या (1100) त्यापैकी 148 बाबींचा निपटारा झाला. त्या खालोखाल पुण्यामध्ये 438 बाबी नोंदल्या गेल्या त्यापैकी 70 बाबींचा निपटारा केला गेला. ठाण्यामधून ही बऱ्याच बाबी नोंदवल्या गेल्या (400). त्यापैकी 70 बाबींचा निपटारा झाला. त्यामानाने अहमदनगर, अमरावती, औरंगाबाद आणि जळगाव या सारख्या अन्य जिल्ह्यांतून कमी बाबी नोंदल्या गेल्या. तसेच कमी बाबींचा निपटारा झाला. बाबींच्या जिल्हानिहाय वितरणावर लक्ष ठेवून बाबी वेळेवर व कार्यक्षम पद्धतीने बाबींचा निपटारा केला जावा यासाठी ती पावले उचलणे आवश्यक आहे. पीडीत पक्षकारांना वेळेवर न्यायदान होणे व राज्यात कायद्याचे राज्य रहावे यासाठी बाबींचा निपटारा होणे आवश्यक आहे.

## विभाग 3

## उदाहरणात्मक खटले

### 1. खटला क्रमांक 2780/2017

### तक्रारीचे स्वरुप - पोलिसांनी छळ करणे

**तक्रादाराचे नाव -** सचिन पी. अंकुशराव

**प्रतिवादीचे नाव -** पोलीस अधिक्षक,
सोलापूर

श्री. केशव वाबळे
सहाय्यक पोलीस निरीक्षक
लोणीकंद पोलीस ठाणे, पुणे
पोलीस अधिक्षक (पुणे ग्रामीण) यांचे मार्फत

डॉ. रमेश खटावकर
खटावकर हॉस्पिटल
पत्रकार नगर
भक्ती मार्ग
पंढरपूर, सोलापूर - 413 304

डॉ. ए. वाय. जोशी
वैद्यकीय अधिकारी
सिव्हील सर्जन यांच्यामार्फत
सिव्हील हॉस्पिटल, सोलापूर

आदेशाचा दिनांक - 1 एप्रिल, 2021

कोरम - एम. ए. सईद, प्रभारी अध्यक्ष / सदस्य

**खटल्याची घटना -** या खटल्यामध्ये अशा दोन घटना आहेत की ज्यामध्ये तक्रारदाराच्या नातेवाईकांना पोलिसांनी छळले असा आरोप केला गेला आहे. पहिली घटना 2013 मध्ये घडली तर दुसरी नंतरच्या वर्षात घडली. या घटनांमधील पीडीत व्यक्ती ही तक्रारदाराचे पुतणे आहेत. श्री. आकाश चंद्रकांत नेहतराव यांचा कोठडीत छळ झाला. याबाबतच्या न्यायालयाच्या आदेशांना संबंधित चुकणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांनी आव्हान दिले नाही किंवा त्यावर हल्ला चढवला नाही. खरे तर 2018 साली त्यांच्यावर (श्री. आकाश चंद्रकांत नेहतराव) यांच्यावर खुनाचा आरोप ठेवला होता. (प्रथम माहिती अहवाल क्रमांक 244/2018) त्यांच्याविरुद्ध दाखल केलेले अनेक गुन्हे न्यायप्रविष्ठ आहेत. किंबहुना, ते (श्री. नेहतराव) अटक टाळण्यासाठी भूमीगत

झाले होते व त्यानंतर त्यांना नंतरच्या टप्प्यात पकडण्यात आले. ते जामीन मिळवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात गेले होते व त्यानंतर पोलिसांनी त्यांना अटक केली. हे सर्व मुद्दे लक्षात घेतल्यावर तक्रारदारांनी पोलीसांवर जे भेदभावाचे आणि प्रतिशोधात्मक कारवाईचे जे आरोप लावले ते आरोप नाकारले जातात.

**आयोगाने केलेली कृती -** दि.12.04.2019 रोजी चौकशी केल्यावर आयोगाने याबाबतीतील सर्व महत्वाच्या घटनांची नोंद घेतली व सर्व संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना नोटीसा पाठवल्या. जखमी पीडीत व्यक्तींचा वैद्यकीय अभिलेख्यांमध्ये स.पो.नि. वाबळे, गोंदिया आणि संबंधित वैद्यकीय अधिकारी श्री. खटावकर व श्री. जोशी यांनी फेरफार केले. तक्रारदाराचा दुसरा पुतण्या / श्री. गोपाळ अंकुशराव यांना कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या दलाच्या सदस्यांनी (पोलिसांनी) छळले व त्यांना अपमानित केले. कारण ते (गोपाळ) एका विशिष्ट राजकीय पक्षाशी निगडीत होते आणि ते नगर परिषदेचे सदस्य होते. तथापि, पोलीस अहवालांमध्ये सतत केलेल्या ठाम विधानामुळे व गुप्तपणे केलेल्या चौकशीद्वारे (निशाणी एल) याला पुष्टी मिळत नाही. गुप्त अहवालावरुन असे दिसून येते की, श्री. गोपाळ अंकुशराव हे खून करणे, खुनाचा प्रयत्न करणे यासारख्या गंभीर गुन्ह्यात गुंतले आहेत.

**आदेशाचा सारांश -** आयोगाने असा आदेश दिला की, स.पो.नि. श्री. केशव वाबळे, (सध्या लोणीकंद पोलीस ठाण्यात नेमणूक) हे पीडीत श्री. आकाश नेहतराव यांचा मानवी हक्क भंग करण्यासाठी जबाबदार आहेत व श्री. वाबळे यांनी आकाश यांना हा आदेश जारी केल्यापासून सहा आठवड्यात रु.1,00,000/- (रुपये एक लाख मात्र) नुकसान भरपाई द्यावी. आयोगाने पोलीस अधिक्षक, पुणे यांना असा आदेश दिला की, जर नियमात बसत असेल तर त्यांनी श्री. वाबळे यांच्याविरुद्ध शिस्त भंगाची कारवाई करावी.

## 2. खटला क्रमांक 6376/2018

## तक्रारीचे स्वरुप - प्राण्यांचे हक्क

**तक्रारदाराचे नाव** अध्यक्ष,
जयराज अपार्टमेंट को.ऑप. हाऊसिंग सोसायटी,
सर्व्हे नं.41, प्लॉट नं.2 व 3,
ओम नगर, अंबाडी रोड, वसई (प.)
जिल्हा - पालघर - 401 202

**प्रतिवादीचे नाव -** महापालिका आयुक्त,
वसई विरार महानगरपालिका,
विरार पोलीस स्टेशन समोर, बाजार वॉर्ड,
विरार (पूर्व) - 401 306

**आदेशाचा दिनांक - 6 एप्रिल, 2021**

**कोरम - एम.ए. सईद, प्रभारी अध्यक्ष / सदस्य**

**खटल्याची घटना -** ही तक्रार सदर सोसायटीमधील रहिवाशांना भटक्या कुत्र्यांपासून उद्‌भवणाऱ्या त्रासाचा प्रश्न हाताळण्यामध्ये उद्‌भवणाऱ्या प्रश्नांशी संबंधित आहे. सोसायटीचे काही सदस्य हा त्रास निर्माण करीत आहेत व त्यांच्याविरुद्‌ध माणिकपूर पोलीस ठाण्यात प्रथम माहिती अहवाल नोंदला गेला आहे. आरोपींनी आपल्या वकिलामार्फत असे उत्तर दिले आहे की भटकी कुत्री / रस्त्यातील कुत्री यांचे निर्बीजीकरण करणाऱ्यांना प्रतिबंधात्मक लस टोचणे व त्यांना अँटी रेबीन लस देणे ही पावले उचलली आहेत व त्याप्रमाणात तक्रारीचे निवारण झाले आहे. तथापि, निशाणीमधील अहवालावरुन असे दिसून येते की, संबंधित महानगर पालिका अधिकाऱ्यांनी ती कुत्री परत त्यांच्या गृहनिर्माण संस्थेच्या विभागात आणली. त्यामुळे या तक्रारीच्या बाबतीत काही उपयोग झाला नाही आणि सदर तक्रारदारांना तो प्रश्न तसाच भेडसावत आहे. त्यांच्या म्हणण्याच्या पुष्टीसाठी कागदपत्रांच्या प्रति व फोटोग्राफ जोडले आहेत (निशाणी ब)

**आयोगाने केलेली कृती -** प्राण्यांच्या हक्काबाबतच्या कायदेशीर चौकटीचे विश्लेषण केल्यानंतर जसे - प्राण्यांना क्रूरपणे वागण्यास प्रतिबंध (प्राण्यांना क्रूरपणे वागण्यास प्रतिबंध करणाऱ्या संस्थेची स्थापना व नियमन) नियम 2011, प्राण्यांना क्रूरपणे वागवण्याविरुद्‌धचा अधिनियम 1960 आणि पूर्वी निकालात काढलेले खटले, जसे टी. एन. गोदावरमन थिरुमलपाद भारत सरकार आणि अन्य (2012) इत्यादी. आयोगाने मुख्य पुरावे व युक्तीवाद यांचे परिशीलन केले व खाली दिलेले आदेश जारी केला.

**आदेशाचा सारांश -** आयोगाने असा आदेश दिला की, नागरी अधिकाऱ्यांनी राज्याच्या संबंधित विभागांबरोबर समन्वय साधावा व कायदे व नियम यांची योग्य पूर्तता करावी. आयोगाने संबंधित स्वारस्यधारकांनी

प्राण्यांना क्रूरतेने वागवण्याला प्रतिबंध अधिनियम 1960 व सर्वोच्च न्यायालयाने याबाबतीत घालून दिलेली मार्गदर्शक तत्वे यांचा विचार करुन मानवी हक्क आयोग, 1993 च्या कलम 19 (इ) यांची पूर्तता करण्याचा अहवाल द्यावा असा आदेश दिला. आयोगाचे सचिव यांनी या आदेशाची प्रत संबंधित नगर पालिका आयुक्त व अतिरिक्त मुख्य सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना या आदेशाची पूर्तता मानवी हक्क संरक्षण अधिनियम, 1993 सह कलम 18 सहपठित नियम 22, 24 महाराष्ट्र राज्य मानवी आयोग (पद्धती) नियमन, 2011 नुसार करावी यासाठी दिली आहे.

**3. खटला क्रमांक 1339/13/20/2019**

**तक्रारीचे स्वरुप - पोलिसांची निष्क्रियता**

**तक्रारदाराचे नाव** सुनिता अलहाट
**प्रतिवादीचे नाव -** पोलीस आयुक्त,
नवी मुंबई

**आदेशाचा दिनांक - 9 एप्रिल, 2021**

**कोरम - एम.ए. सईद, प्रभारी अध्यक्ष / सदस्य**

**खटल्यातील बाब -** तक्रारदारांवर व तिच्या नवऱ्यावर तिच्या विरोधकांनी शारीरिक हल्ला केला, त्यांच्या संबंधात गुन्हे केले व तिच्या जंगम मालमत्तेचे नुकसान केले. तरीसुद्धा त्या विरोधकांविरुद्ध प्रथम माहिती अहवाल पोलिसांनी दाखल केला नाही. याबाबत हा खटला आहे. सदर तक्रारदार हे तिचा नवरा हे फसवणूक अफरातफर या गुन्ह्यामध्ये गुंतले आहेत असे आरोप करुन त्यांची प्रतिमा मलीन करण्याचा निष्फळ प्रयत्न केला आहे.

**आयोगाने केलेली कृती -** आयोगाचे अन्वेषण विभाग यांचा चौकशी अहवाल असे दर्शवितो की, फौजदारी प्रक्रिया, 1973 कलम 154 नुसार प्रथम माहिती अहवाल दाखल करायला हवा होता. या त्रुटीमुळे तक्रारदारांच्या मानवी हक्कांचा भंग झाला आहे.

**आदेशाचा सारांश -** आयोगाने मानवी हक्क आयोग, 1993 च्या कलम 18 अंतर्गत प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन अशी शिफारस केली की संबंधित अपराधी यांना पोलीस अधिकारी श्री. बावीसकर यांनी अशी ताकीद दिली की त्यांनी यापुढे पीडीत व्यक्तींबरोबर वागताना काळजीपूर्वक रहावे तसेच त्यांनी पीडीत व्यक्तींचे चारित्र्य व पत प्रतिष्ठा यावर निर्णय देण्याऐवजी कायद्याच्या तरतुदीचे पालन करावे. तसेच उप महापोलीस संचालक यांनी वेळोवेळी पोलीस दलाबरोबर सहसंवाद साधावा व त्यांना त्यांच्या

कर्तव्याबाबत जागरुक करणे याबाबत तसेच त्यांना कार्यपद्धतीबाबतच्या कायद्याबद्दल पोलीस प्रशिक्षण शाळा, नाशिक येथे प्रशिक्षण द्यावे.

**4. खटला क्रमांक 465/13/29/2021**

**तक्रारीचे स्वरुप - पोलिसांची निष्क्रियता**

**तक्रारदाराचे नाव** मानसी दत्तात्रय गिरप
फ्लॅट क्रमांक ५०४, ओम लेवा विकास निकेतन
नानेपाडा, नानेपाडा रोड,
मुलुंड (पू), मुंबई

**प्रतिवादीचे नाव -** पोलीस अधिक्षक
सिंधुदुर्ग

**आदेशाचा दिनांक - 16 एप्रिल, 2021**

**कोरम - एम.ए. सईद, प्रभारी अध्यक्ष / सदस्य**

**खटल्याची बाब -** तक्रारदार हे अडसुल गाव वेंगुर्ले तालुका सिंधुदुर्ग जिल्हा येथील 6 गुंठे जमिनीचे मालक आहेत. त्या जमिनीवर काजूची झाडे, फणसाची झाडे, जांभळाची झाडे आहेत. तक्रारदारानुसार दि.06.12.2020 रोजी तक्रारदाराच्या ओळखीच्या व्यक्तीने असे कळवले की, श्री. तुलसीदास गावडे आणि अन्य 4-5 व्यक्ती तक्रारदाराच्या जमिनीमध्ये घुसले आहेत व त्यांची काजूची काही झाडे तोडली आहेत. तक्रारदार पोलीस ठाण्यामध्ये गेले व त्यांनी संशयित आरोपींविरुद्ध तक्रार दाखल केली. तथापि, पोलीस ठाण्यातील प्रभारी अधिकारी यांनी तक्रारदार यांना वन अधिकाऱ्यांना भेटायला सांगितले. त्यामुळे तक्रारदार वन अधिकारी यांना भेटल्या. वन अधिकाऱ्यांनी घटनास्थळाला भेट दिली व तेथील तपासणी केली व तक्रारदारांना पोलिसांकडे जायला सांगितले. त्यानुसार तक्रारदार पोलिसांना अनेक वेळा भेटले पण तरीही पोलिसांनी तिचा अहवाल नोंदवून घेतला नाही. तक्रारदार मुंबईला परत आल्यावर त्यांनी पोलिसांना अहवाल पोष्टाने पाठवले. तथापि, पोलिसांनी उचित उत्तर दिले नाही. तक्रारदाराचे पती पोलिसांच्या पोलीस आयुक्त, कोकण विभाग या सर्वोच्च अधिकाऱ्यांना भेटले. त्यांनी तक्रारदाराला सांगितले की, त्यांनी पोलीस अधिक्षक, सिंधुदुर्ग यांना भेटावे. या पार्श्वभूमीवर तक्रारदार हे संबंधित पोलिसांच्या निष्क्रीयतेमुळे व्यथित झाले की पोलिसांनी तिच्या अहवालाची दखल घेतली नाही व चोरी तसेच गुन्हेगारी स्वरुपाचे अतिक्रमण अशा गंभीर गुन्ह्यांची ही दखल घेतली नाही, त्यामुळे तक्रारदाराने आयोगाकडे मानवी हक्क संरक्षण कायदा, 1993 च्या कलम 12 अंतर्गत संपर्क साधला.

**आयोगाने केलेली कृती -** खटल्याची चौकशी पूर्ण केल्यावर व अहवालांचे, उत्तरांचे व आयोगासमोर आलेल्या पुराव्यांचे परीशीलन केल्यानंतर आयोगाने असा निर्णय घेतला की, संबंधित अधिकाऱ्यांनी गंभीर चुका केल्या आहेत व त्यामुळे तक्रारदाराच्या मानवी हक्कांचे उल्लंघन झाले आहे व न्यायाची पायमल्ली झाली आहे.

**आदेशाचा सारांश -** आयोगाने मानवी हक्क आयोग, 1993 च्या कलम 18 अंतर्गत प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन अशी शिफारस केली की संबंधित अपराधी पोलीस अधिकारी श्री. बावीसकर यांना अशी ताकीद द्यावी की त्यांनी यापुढे पीडीत व्यक्तींबरोबर वागताना काळजीपूर्वक रहावे तसेच त्यांनी पीडीत व्यक्तींचे चारित्र्य व पत प्रतिष्ठा यावर निर्णय देण्याऐवजी कायद्याच्या तरतुदीचे पालन करावे. तसेच उप महापोलीस संचालक यांनी वेळोवेळी पोलीस दलाबरोबर सहसंवाद साधावा व त्यांना त्यांच्या कर्तव्याबाबत जागरुक करणे याबाबत तसेच त्यांना कार्यपद्धतीबाबतच्या कायद्याबद्दल पोलीस प्रशिक्षण शाळा, नाशिक येथे प्रशिक्षण द्यावे.

**आदेशाचा सारांश -** हा आदेश मानवी हक्क संरक्षण अधिनियम, 1993 सह कलम 18 सहपठित नियम 22, 24 महाराष्ट्र राज्य मानवी आयोग (पद्धती) नियमन, 2011 नुसार शिफारस करावी यासाठी दिला आहे. आयोगाने असा आदेश दिला की विशेष महापोलीस निरीक्षक, कोकण विभाग यांच्या कार्यालयाने पोलीस अधिक्षक, सिंधुदुर्ग यांना आदेश द्यावा की त्यांनी तक्रारदाराच्या दिनांक 07.12.2020 च्या अहवालाच्या आधारावर भारतीय दंड विधानाच्या संबंधित कलमांतर्गत प्रथम माहिती अहवाल दाखल करावा आणि कायद्यानुसार पुढील अन्वेषण करावे. हे अन्वेषण त्यांनी स्वत: करावे किंवा त्यांच्या देखरेखी खाली वरिष्ठ विभाग पोलीस अधिकारी या दर्जाच्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी करावे. हे अन्वेषण ठराविक मुदतीत पार पाडावे. विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण विभाग यांनी स. पो. नि. शेखर दाभोळकर, वेंगुर्ला पोलीस ठाणे यांना असा आदेश द्यावा की, श्री. दाभोळकर यांनी तक्रारदार श्रीमती मानसी दत्ताराम गिरप यांच्या मानवी हक्कांची पायमल्ली झाल्यामुळे त्यांना रु.1,00,000/- इतकी नुकसान भरपाई द्यावी. संबंधित अधिकारी दाभोळकर यांना नाशिक मधील पोलीस प्रशिक्षण शाळेत प्रशिक्षणासाठी पाठवून कायदा व तत्संबंधित बाबतीतील त्यांचे ज्ञान अद्ययावत करावे की ज्यायोगे ते अशी घोडचूक करणार नाहीत. विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण विभाग यांच्या कार्यालयाने पोलीस अधिक्षक, सिंधुदुर्ग यांना असा आदेश द्यावा की, त्यांनी श्री. शेखर दाभोळकर यांनी आपल्या पोलीस अधिकाऱ्याच्या कर्तव्यामध्ये कसूर व मोठा निष्काळजीपणा केल्यामुळे त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्याचा विचार करावा. विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण विभाग यांच्या कार्यालयाने त्यांच्या हाताखालच्या अधिकाऱ्यांसाठी वेळोवेळी कार्यशाळा आयोजित कराव्यात व जागृती करण्यासाठी कार्यक्रम करावे की ज्याद्वारे ते पद्धतीबाबतच्या कायद्याबाबत अद्ययावत राहतील.

आयोगाचे सचिव यांनी या आदेशाची प्रत संबंधित नगर पालिका आयुक्त व अतिरिक्त मुख्य सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आदेशाची पूर्तता हा आदेश मानवी हक्क संरक्षण अधिनियम, 1993

सह कलम 18 सहपठित नियम 22, 24 महाराष्ट्र राज्य मानवी आयोग (पद्धती) नियमन, 2011 नुसार करावी यासाठी दिली आहे.

**5. खटला क्रमांक 4624/13/23/2021**

**तक्रारीचे स्वरुप - वर्तमानपत्रातील बातमीवरुन स्वत: कृती करणे**

**प्रतिवादीचे नाव -** पोलीस उप आयुक्त,
विभाग - 8, मुंबई

**आदेशाचा दिनांक - 21 फेब्रुवारी, 2022**

**कोरम - एम.ए. सईद, सदस्य**

**खटल्याची बाब -** वर्तमानपत्रात अशी बातमी आली होती की, स.पो.नि विक्रम ए. पाटील नेमणूक वाकोला पोलीस ठाणे की जे पोलीस उप आयुक्त विभाग 7, मुंबई यांचे अखत्यारीत येते, हे एका हॉटेल मालकाला छळत आहेत व त्यांच्यावर शारीरिक अत्याचार करीत आहेत. चूक करणारे पोलीस अधिकारी श्री. पाटील यांनी वाकोला पोलीस ठाण्याजवळ असलेल्या स्वागत रेस्टॉरंटच्या मालकांना दि.23.12.2021 च्या रात्री फोन करुन खाणे मागवले. परंतु ते रेस्टॉरंट बद असल्याने मालकाने आपली असमर्थता दर्शवली. सदर पोलीस अधिकारी आपल्या सहकाऱ्यांबरोबर हॉटेलात गेले, तेथील काऊंटरवर असलेल्या कॅशियरबरोबर त्यांनी वाद घातला व त्याला मारले. या घटना सीसीटीव्ही मध्ये कैद झाल्या आणि माध्यमांमध्ये त्यांचा प्रसार झाला. चूक करणारे स.पो.नि पाटील यांचे शिस्त अधिकारी व पर्यवेक्षक अधिकारी यांनी स.पो.नि. अनिल पाटील यांना गंभीर गैरवर्तनासाठी दोषी ठरवले आणि त्यानंतर दि.24.12.2021 च्या आदेशानुसार निलंबित केले.

**आयोगाने केलेल्या कृती -** आयोगाने या गंभीर घटनेची स्वत: होऊन दखल घेतली व उप पोलीस आयुक्त, विभाग - 8, मुंबई यांच्याकडून अहवाल मागवला. ही चौकशी आभासी पद्धतीने केली गेली. मानवी हक्क संरक्षण कायदा, 1993 च्या कलम 16 अंतर्गत कारणे दाखवा नोटीस अधिकाऱ्यांना पाठवली होती. अधिकाऱ्यांनी दिलेला खुलासा स्वीकारार्ह नव्हता कारण त्यामध्ये फक्त जबाबदारी ढकलली होती.

**आदेशाचा सारांश -** आयोगाने असा निष्कर्ष काढला की, चूक करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याला, पर्यवेक्षक अधिकाऱ्यांनी निलंबित करणे व त्याच्याविरुद्ध पीडीत व्यक्तीच्या विनंतीनुसार कलम 323 इत्यादीविरुद्ध अदखलपात्र गुन्हा दाखल करणे यामुळे प्रतिवादीची पत कमी होते. या दोन घटकांचा विचार केल्यावर मानवी हक्कांचे उल्लंघन झालेले स्पष्टपणे दिसून येते. आयोगाने मानवी हक्क संरक्षण अधिनियम, 1993 च्या कलम 18 च्या अंतर्गत शिफारस केली आणि अतिरिक्त मुख्य सचिव (गृह) यांना असा आदेश दिला की, त्यांनी पीडीत व्यक्तीला रु.2,00,000/- (रुपये दोन लाख मात्र) इतकी नुकसान भरपाई द्यावी. सदर रक्कम

चुकणारे पोलीस अधिकारी स.पो.नि विक्रम पाटील यांच्याकडून वसूल करावी. आयोगाने असाही आदेश दिला की, अतिरिक्त मुख्य सचिव (गृह) यांनी पोलीस महासंचालक यांना असा आदेश द्यावा की त्यांनी पोलीसांच्या अधिकाराचा गैरवापर होऊ नये यासाठी मार्गदर्शक तत्वे घालून द्यावीत त्यामध्ये प्रामुख्याने पुढील बाबींवर भर असावा - (अ) कृतीमध्ये पारदर्शकता, (ब) जबाबदारी, (क) योग्य कार्य संस्कृती निर्माण करणे, (ड) मूळ मानवी मूल्यांशी सुसंगत असे प्रशिक्षण पोलीस दलाला देणे, (इ) पोलीस दलाची प्रशिक्षण पद्धतीची पुनर्रचना करणे, (फ) पोलिसांना मूलभूत मानवी मूल्ये समजावणे व त्यांना संविधानात्मक आचार याबद्दल जागरुक करणे (ग) अन्वेषण करणाऱ्या पोलीस दलाच्या व्यक्तींचा दृष्टीकोन व वृत्ती बदलणे की ज्याद्वारे अन्वेषण करताना मूळ मानवी मूल्यांचा बळी दिला जाणार नाही व अन्वेषणासाठी आक्षेपार्ह मार्ग अनुसरावे लागणार नाहीत, (ह) अन्वेषण चालू असताना अटक केलेल्या व्यक्तीची सल्लागार व्यक्ती हजर असल्याने पोलीस थर्ड डीग्री पद्धत (आरोपीला मारहाण करणे) अशा गोष्टींचा अवलंब करणार नाहीत. संबंधित पोलीस ठाण्याचे संबंधित पोलीस उप आयुक्त यांनी भारतीय दंड विधान कलम 330 अंतर्गत दोषारोप लावण्याचा विचार करावा. या कलमा अंतर्गत अन्वेषण करताना छळ करणे हे शिक्षेला पात्र आहेत. आयोगाचे सचिव यांनी या आदेशाची प्रत संबंधित नगर पालिका आयुक्त व अतिरिक्त मुख्य सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना या आदेशाची पूर्तता हा आदेश मानवी हक्क संरक्षण अधिनियम, 1993 सह कलम 18 सहपठित नियम 22, 24 महाराष्ट्र राज्य मानवी आयोग (पद्धती) नियमन, 2011 नुसार करावी यासाठी दिली आहे.

## 6. खटला क्रमांक 1030/2016

### तक्रारीचे स्वरुप - वैद्यकीय व्यावसायिकांकडून निष्काळजीपणा - मानवी हक्कांचे उल्लंघन

**प्रतिवादीचे नाव -** प्रधान सचिव
सार्वजनिक आरोग्य विभाग
जी.टी. हॉस्पिटल कंपाऊंड
मुंबई

संचालक
आरोग्य सेवा संचालनालय
आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस हॉस्पिटल,
मुंबई - 1

**आदेशाचा दिनांक - 29 मार्च, 2022**

**कोरम - एम.ए. सईद, सदस्य**

**खटल्याच्या बाबी -** सदर खटला राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाने राज्य आयोगाकडे दि.15.02.2016 रोजी पाठविला होता. नोव्हेंबर, 2015 मध्ये मुंबई येथे मोतीबिंदूच्या काही शस्त्रक्रिया झाल्या होत्या. त्यातील काही शस्त्रक्रिया फसल्या होत्या व त्यामध्ये 14 रुग्ण आंधळे झाले होते. नेत्रतज्ञ डॉ. लहाने यांच्या अध्यक्षतेखालील समितीने त्यासाठी वैद्यकीय संघाला दोषी ठरवले होते व रु.1,00,000/- इतकी नुकसान भरपाई देण्याचा आदेश दिला.

**आयोगाने केलेल्या कृती -** राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाकडून तक्रार प्राप्त झाल्यावर आयोगाने संबंधित पक्षकारांना अहवाल सादर करण्यास सांगितले. संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांना मानवी हक्क संरक्षण कायदा, 1993 च्या कलम 16 अंतर्गत कारणे दाखवा नोटीस देण्यात आल्या व त्यांच्याकडून उत्तर मागवले होते.


**आदेशाचा सारांश -** योग्य विचार करुन सुनावणी घेतल्यानंतर आणि सर्व महत्वपूर्ण पुराव्याचे परीशीलन केल्यावर आयोगाने असा निष्कर्ष काढला की वैद्यकीय टीमने मानवी हक्कांचे उल्लंघन केले आहे. कारण अत्यंत निष्काळजीपणामुळे 14 रुग्ण आंधळे झाले आहेत. मानवी हक्क संरक्षण कायदा, 1993 च्या कलम 18 नुसार आयोगाला याबाबतीत लक्ष घालायला अधिकार आहे. वैद्यकीय टीमने दिलेले खुलासे त्यांचे संरक्षण करु शकले नाहीत. आयोगाने केलेल्या शिफारशींचा सारांश पुढे दिला आहे. चार वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सर्वांनी मिळून 14 व एकट्याने अंध झालेल्या व्यक्तींना प्रत्येकी रु.5,00,000/- द्यायचे आहेत. संचालक, आरोग्य सेवा यांच्या कार्यालयाने ही रक्कम वसूल करायची आहे, आणि पीडीतांच्या खात्यात जमा करायची आहे. या आदेशाची अंमलबजावणी सहा आठवड्यात न झाल्यास आदेशाच्या तारखेपासून अंमलबजावणी होईपर्यंत 12% व्याज द्यावे लागेल. (वैद्यकीय टीमचे) पर्यवेक्षक अधिकारी व नेमणूक करणाऱ्या अधिकाऱ्यांनी या वैद्यकीय टीमवर भारतीय दंड विधाना अंतर्गत खटला दाखल करण्याचा विचार करावा. आरोग्य सेवा संचालकांवर अशी जबाबदारी आहे की, त्यांनी वेळोवेळी जागृती कार्यक्रम हाती घ्यावा. आयोगाच्या सचिवांना या आदेशाची प्रत उचित कारवाईसाठी अग्रेषित केली आहे.

**उदाहरणार्थ दिलेल्या खटल्याचा सारांश -** वर्ष 2021-22 मध्ये कोर्ट रुम 2 मधून 6 खटले आलेले आहेत ते असे :- पोलिसांनी केलेला छळ एक प्राण्यांचे हक्क दोन पोलिसांची निष्क्रीयता एक स्वत: होऊन हाताळलेला खटला व एक वैद्यकीय निष्काळजीपणा कोरममध्ये एम.ए. सईद, प्रभारी अध्यक्ष / सदस्य, मानवी हक्क संरक्षण कायदा, 1993 च्या कलम 18 अंतर्गत कारणे दाखवा नोटीस बनावटी खटल्यांशी संबंधित शपथपत्रे, फाईल्स यांचे परिशीलन करुन व दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकून आयोगाने मानवी हक्क संरक्षण कायदा, 1993 च्या कलम 18 अंतर्गत आणि महाराष्ट्र राज्य मानवी आयोग (पद्धती) नियमन, 2011 च्या नियम 21 व 22 अंतर्गत आपल्या शिफारशी दिल्या आहेत.

## विभाग 4

### आयोगाने दिलेल्या भेटी

मानवी हक्क आयोगाच्या कार्यावर नियंत्रण ठेवणाऱ्या मानवी हक्क संरक्षण कायदा, 1993 च्या कलम 12 (क) नुसार आयोगाला असा आदेश आहे की, आयोगाने राज्य सरकारला पूर्वसूचना देऊन आयोगाने अशा ठिकाणी भेटी द्यायला हव्यात की जेथे राज्य सरकारच्या नियंत्रणाखालील ज्या जागेमध्ये व्यक्ती उपचारासाठी, सुधारण्यासाठी किंवा संरक्षणासाठी ठेवल्या आहेत. आयोगाने अशा ठिकाणी भेटी देऊन तेथे राहणाऱ्या व्यक्तीच्या परिस्थितीचा अभ्यास करावा व त्याबाबत शिफारसी कराव्यात. त्यानुसार आयोगाचे मा. अध्यक्ष, सचिव व अन्वेषण विभागाचे प्रमुख पोलिसांचे विशेष महानिरीक्षक, निबंधक व अन्य कर्मचाऱ्यांनी भेटी दिल्या.




| अ.क्र. | भेटीचा दिनांक | जिल्हा | भेटीचे ठिकाण | भेटीचा प्रकार | भेट देणारा गट |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 21.12.2021 | मुंबई | बाल निरीक्षण गृह, उमेरखाडी | नियोजित | मा. अध्यक्ष न्यायमूर्ती (निवृत्त) श्री. के.के. तातेड, मा. सदस्य श्री. एम.ए. सईद, मा. सदस्य श्री. बी.डी. मोरे, पोलीस अधीक्षक, अन्य कर्मचारी |
| 2. | 26.12.2021 | नागपूर | सदर पोलीस ठाणे | अचानक | मा. सदस्य श्री. बी.डी. मोरे, पोलीस |
| 3. | 26.12.2021 | नागपूर | लकडगंज पोलीस ठाणे | अचानक | मा. सदस्य श्री. बी.डी. मोरे, पोलीस |
| 4. | 07.01.2022 | पुणे | लोणावळा ग्रामीण पोलीस ठाणे | अचानक | मा. सदस्य श्री. बी.डी. मोरे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 5. | 14.01.2022 | पुणे | लोणावळा शहर पोलीस ठाणे | अचानक | मा. सदस्य श्री. बी.डी. मोरे |
| 6. | 08.02.2022 | पुणे | शिकारपूर पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड | नियोजित | पोलीस अधीक्षक आणि कर्मचारी |
| 7. | 12.02.2022 | रायगड | अलिबाग | अचानक | मा. सदस्य श्री. एम.ए. सईद |
| 8. | 13.02.2022 | पुणे | वाकड पोलीस ठाणे | अचानक | मा. सदस्य श्री. बी.डी. मोरे |
| 9. | 20.02.2022 | पालघर | जिल्हाधिकारी कार्यालय | नियोजित | विशेष पोलीस महानिरीक्षक, पोलीस अधीक्षक, पोलीस निरीक्षक आणि कर्मचारी |
| 10. | 26.02.2022 | सिंधूदुर्ग | वेंगुर्ला पोलीस ठाणे | अचानक | मा. सदस्य श्री. बी.डी. मोरे |
| 11. | 28.02.2022 | सिंधूदुर्ग | मालवण पोलीस ठाणे आणि सावंतवाडी पोलीस ठाणे | अचानक | मा. सदस्य श्री. बी.डी. मोरे |
| 12. | 06.03.2022 | बारामती | बारामती तालुका पोलीस ठाणे | अचानक | मा. सदस्य श्री. बी.डी. मोरे |
| 13. | 13.03.2022 | अहमदनगर | अहमदनगर | अचानक | मा. सदस्य श्री. बी.डी. मोरे |
| 14. | 15.03.2022 | पालघर | जिल्हाधिकारी कार्यालय | नियोजित | विशेष पोलीस महानिरीक्षक, पोलीस अधीक्षक, पोलीस निरीक्षक आणि कर्मचारी |
| 15. | 18.03.2022 | नाशिक | घोटी पोलीस ठाणे | अचानक | मा. सदस्य श्री. बी.डी. मोरे |
| 16. | 29.03.2022 | रायगड | कर्जत पोलीस ठाणे | नियोजित | पोलीस अधीक्षक, पोलीस निरीक्षक आणि कर्मचारी |

अचानक किंवा अनियोजित भेटी व नियोजित भेटी या शासन नागरिकांच्या मानवी हक्कांचे पालन कितपत करते हे तपासण्याचे साधन आहे.

मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी कायद्याद्वारे शासित उपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी राज्य सरकारच्या जबाबदारीची पुष्टी करण्यासाठी अचानक / अनियोजित भेट हे एक प्रभावी माध्यम आहे.

मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी केलेल्या कायद्यामध्ये ज्या तरतुदी केल्या आहेत त्यांच्या पूर्ततेसाठी शासकीय संस्थांनी कोणती पावले उचलली आहेत ते तपासण्यासाठी व त्याची देखरेख करण्यासाठी नियोजित भेटी हा प्रभावी मार्ग आहे.

## विभाग 5

## जनजागृती कार्यक्रम

मानवी हक्कांचे संरक्षण कायद्याच्या कलम 12 (एच) आणि (आय) च्या तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग मानवी हक्क संरक्षण कायदा, 1993 च्या कलम 12 मध्ये नमूद केलेली आयोगाची कामे पुढीलप्रमाणे आहेत.

कलम 12 (एच) मध्ये असे म्हंटले आहे की, आयोग समाजाच्या विविध भागात मानवी हक्कांबाबत जागरुकतेचा प्रसार करील व मानवी हक्क साक्षरतेबाबत, जागरुकतेचा प्रसार करील. आयोग हे कार्य प्रकाशने, माध्यमे, चर्चासत्रे व अशा अन्य मार्गाने करील.

कलम 12 (आय) मध्ये असे म्हंटले आहे की, आयोग अशासकीय संस्थांना व संघटनांना मानवी हक्कांच्या क्षेत्रात काम करण्यास प्रोत्साहन देईल.

### जनजागृती कार्यक्रम

| अ.क्र. | कार्यक्रमाचा दिनांक | कार्यक्रमाचे स्थान | कार्यक्रमाचे ठिकाण | उपस्थित असलेले सदस्य |
|---|---|---|---|---|
| 1. | 26.01.2022 | उमेरखाडी, मुंबई | डोंगरी बालगृह | अध्यक्ष आणि सदस्य |
| 2. | 08.02.2022 | पिंपरी, चिंचवड, पुणे | शिकारपूर पोलीस ठाणे | पोलीस अधीक्षक आणि कर्मचारी |
| 3. | 20.02.2022 | पालघर, महाराष्ट्र | जिल्हाधिकारी कार्यालय | विशेष पोलीस महानिरीक्षक, पोलीस अधीक्षक, पोलीस निरीक्षक |
| 4. | 15.03.2022 | पालघर, महाराष्ट्र | जिल्हाधिकारी कार्यालय | अध्यक्ष, सदस्य, विशेष पोलीस महानिरीक्षक |

हेतू धर्मादाय न्यासाने (ट्रस्टने) पहिला कार्यक्रम महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाच्या समन्वयाने डोंगरी, उमरखाडी, मुंबई येथील बालगृहात आयोजित केला. त्या कार्यक्रमात आयोगाने मुलांच्या आवश्यकतेनुसार अत्यावश्यक गोष्टी पुरवल्या. सदर कार्यक्रम मा. न्यायाधीश श्री. के.के. तातेड, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मा. सदस्य श्री. एम.ए. सईद, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग यांच्या उपस्थितीत आयोजित केला होता.

इतर कार्यक्रम महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाने मानवी हक्क संरक्षण कायदा, 1993 च्या तरतुदींनुसार आयोजित केले. “जागृती व संवेदनशील करणे” हा कार्यक्रम शासनाच्या विविध विभागाच्या अधिकाऱ्यांसाठी तसेच सर्व सामान्य जनतेसाठी आयोजित केले जातात.

## विभाग 6

## शासनाला केलेल्या शिफारसी

मानवी हक्क संरक्षण अधिनियम, 1993 च्या कलम 18 अंतर्गत आयोगाला शिफारसी करण्याचा अधिकार आहे. या कलमानुसार आयोगाला मानवी हक्क भंगाच्या बाबतच्या तक्रारींबाबत चौकशी करण्याचा व शासनासह संबंधित अधिकाऱ्यांना शिफारसी करण्याचा अधिकार आहे. ज्या बाबतीत आयोगाला असे वाटते की, मानवी हक्कांचे उल्लंघन झाले आहे तिथे आयोग शासनासह संबंधित अधिकाऱ्यांना योग्य कृती करण्याची शिफारस करु शकतो. अशा शिफारसींमध्ये मानवी हक्कांचे उल्लंघन पुढे होऊ नये यासठी उपाय योजणे, पीडीत व्यक्तींना मोबदला देणे व हिंसाचार / अत्याचार करणाऱ्याविरुद्‌ध कृती करणे यांचा समावेश असतो.

त्याखेरीज आयोग मानवी हक्कांच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी उपाय योजना सूचवू शकतो व मानवी हक्कांच्या बाबतीत राज्य सरकारला मार्गदर्शक तत्वे सूचवू शकतो.

आयोगाने केलेल्या शिफारसी बंधनकारक नाहीत, परंतु त्याला बरेच महत्व आहे व सर्वसाधारणपणे संबंधित अधिकारी त्यांची अंमलबजावणी करतात.

| अ.क्र. | खटला क्रमांक | आदेश दिनांक | शिफारसी |
|---|---|---|---|
| 1. | एमएएस / केस नं.2780/2017 | 01.04.2021 | आयोगाने पोलीस उपनिरीक्षक श्री. केशव कांबळे यांना असा आदेश दिला की, त्यांनी पीडीत व्यक्तीला आदेश दिल्यापासून सहा आठवड्यात रु.1,00,000/- (रुपये एक लाख फक्त) भरपाई द्यावी. आयोगाने पोलीस अधिक्षक यांना असा ही आदेश दिला की, त्यांनी पोलीस उपनिरीक्षक श्री. केशव कांबळे यांच्याविरुद्‌ध नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करावी. |
| 2. | एमएएस / केस नं.6376/2018 | 06.04.2021 | आयोगाने मुख्य स्वारस्यधारकाला (स्टेक होल्डर) असा आदेश दिला की, त्यांनी प्राण्यांविरुद्‌ध क्रूरता प्रतिबंधक अधिनियम, 1960 या कायद्‌याचे तसेच याबाबतीत सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करावे व मानवी हक्क संरक्षण कायदा, 1993 कलम 18 नुसार या आदेशाची पूर्तता आयोगाला कळवण्याचा आदेश दिला.<br><br>मानवी हक्क संरक्षण कायदा, 1993 कलम 18 सहपठित महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | (पद्धती) नियम 2011 नुसार आयोगाशी संबंधित सचिव यांच्या कार्यालयाने या आदेशाची प्रत संबंधित नगरपालिका आयुक्त यांच्या कार्यालयाला व अतिरिक्त मुख्य सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या कार्यालयाला माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठवून दिली. |
| 3. | एमएएस / केस नं.1339/13/20/2019 | 09.04.2021 | चूक करणारे संबंधित पोलीस निरीक्षक श्री. बाविसकर यांना अशी ताकीद द्यावी की, त्यांनी भविष्यामध्ये पीडीत बळींबरोबर वागताना काळजी घ्यावी व पीडीतांची विश्वासार्हता व चारित्र्य याबाबत निर्णय करण्याऐवजी कायद्यानुसार कृती करावी. तसेच असे सुचवले जाते की, उप महापोलीस निरीक्षक, महाराष्ट्र राज्य यांनी आपल्या हाताखालच्या पोलीस दलाबरोबर वेळोवेळी पोलीस दलाच्या कर्तव्याचे महत्व समजावून सांगावे, त्यांना साधार असल्याचे दाखवलेला कायदा आणि कायद्याने घालून दिलेल्या पद्धती यांची जाणीव करुन द्यावी, यासाठी त्यांच्याबरोबर संवाद साधावा व त्यांना पोलीस प्रशिक्षण केंद्र, नाशिक येथे प्रशिक्षणासाठी पाठवावे. |
| 4. | एमएएस / केस नं.465/13/29/2021 | 16.04.2021 | विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण विभाग यांना खालील शिफारसी केल्या जातात -<br>• सिंधुदूर्ग पोलीस निरीक्षक यांना असा आदेश द्यावा की, त्यांनी तक्रारदाराच्या अहवालावर आधारित भारतीय दंड विधानाच्या संबंधित तरतुदी अंतर्गत प्रथम माहिती अहवाल (एफ.आय.आर.) दाखल करावा व त्याचे समयबद्ध पद्धतीने अन्वेषण करावे.<br>• संबंधित अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. शेखर दाभोळकर यांना नाशिक येथील पोलीस प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रशिक्षण द्यावे व त्यांचे कायद्याचे ज्ञान अद्ययावत करावे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | • संबंधित अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. शेखर दाभोळकर, वेंगुर्ला पोलीस ठाणे यांना असा आदेश द्यावा की, त्यांनी पीडीत व्यक्तींच्या मानवी हक्कांचे उल्लंघन केले त्यामुळे त्यांनी पीडीताला रु.1,00,000/- नुकसान भरपाई द्यावी.<br>• पोलीस अधिक्षक, सिंधुदूर्ग यांनी उप पोलीस निरीक्षक श्री. शेखर दाभोळकर यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्याचा विचार करावा.<br>• सर्व विभागांमध्ये सहाय्यक अधिकाऱ्यांना कायद्याने अद्ययावत करण्यासाठी वेळोवेळी कार्यशाळा व संवेदनशीलता प्रशिक्षण आयोजित करावे. |
| 5. | एमएएस / केस नं.4624/13/23/2021 | 21.02.2022 | मानवी हक्क संरक्षण कायदा, 1993 कलम 18 अंतर्गत असा आदेश दिला की, अतिरिक्त मुख्य सचिव (गृह) यांनी पीडीत व्यक्तीला रु.2,00,000/- इतकी नुकसान भरपाई हा आदेश प्राप्त झाल्यावर सहा आठवड्यात द्यावी. |
| 6. | एमएएस / केस नं.1030/2016 | 29.03.2022 | चार वैद्यकीय अधिकाऱ्यांनी एकत्रित व वैयक्तिकरीत्या 14 पैकी प्रत्येक पीडीत व्यक्तीला रु.5,00,000/- इतकी नुकसान भरपाई द्यावी. ही रक्कम वसूल करुन पीडीत व्यक्तींना देण्याची जबाबदारी संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांची आहे. या आदेशाची अंमलबजावणी 6 आठवड्यात न झाल्यास त्याची पूर्तता होईपर्यंत 12% व्याजही दिले पाहिजे. सदर वैद्यकीय संघावर भारतीय दंड विधाना अंतर्गत शिस्त भंगाची कारवाई करण्याचा विचार करावा. वेळोवेळी जागृती कार्यक्रम आयोजित करण्याची जबाबदारी आरोग्य संचालनालयाच्या संचालकांवर आहे. आयोगाच्या सचिवांनी या आदेशाची प्रत आवश्यक त्या पूर्ततेसाठी अग्रेषित करावी. |

उपरोक्त तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे आयोगाने विविध बाबींमध्ये नुकसान भरपाई देण्याचा आणि नुकसान भरपाई देण्याची शिफारस करण्याचा आपला अधिकार बजावला आहे.


सदर तक्त्यामध्ये महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाने विविध बाबींमध्ये मानवी हक्कांचा भंग झाल्यामुळे नुकसान भरपाई देण्याची शिफारस केलेल्या बाबींचा सारांश दिला आहे. सदर नुकसान भरपाईची रक्कम रु.1,00,000/- ते रु.5,00,000/- या मर्यादेमध्ये आहे. मानवी हक्क भंगाच्या किरकोळ बाबींमध्ये कमीत कमी नुकसान भरपाईची शिफारस केली आहे, तर गंभीर बाबींमध्ये की ज्यात जीव गमवावा लागला आहे किंवा अत्यंत गंभीर दुखापत झाली आहे त्यामध्ये जास्त नुकसान भरपाईची शिफारस केली आहे.

जास्तीत जास्त बाबींमध्ये पोलीस अधिकारी कर्तव्य बजावत असताना योग्य कृती करण्यात कमी पडले आहेत. शिफारशीमध्ये मानवी हक्क भंगाच्या अधिक घटना होऊ नयेत यासाठीच्या शिफारसी, पीडितांना नुकसान भरपाई व हिंसाचार करणाऱ्याविरुद्ध कृती यांचा समावेश आहे. आयोगाने शिफारस केलेली नुकसान भरपाई सदर मानवी हक्क भंग किती गंभीर आहे, त्यामुळे नुकसान किती झाले आहे हिंसाचार करणाऱ्याची आर्थिक स्थिती यावर अवलंबून आहे. उपरोक्त तक्त्यामध्ये मानवी हक्काचे उल्लंघन व हक्क भंगामुळे पीडीत झालेल्या व्यक्तींना पुरेशी नुकसान भरपाई मिळावी यामध्ये आयोगाची भूमिका यावर प्रकाश पडतो. मानवी हक्क भंगाच्या बाबी हलक्या समजू नयेत व हिंसाचार करणाऱ्यांना त्यांच्या कृतीबद्दल जबाबदार धरावे यासाठी हे एक स्मरणपत्र म्हणूनही काम करते.


## विभाग 7

### स्त्रोत

| अनुदान | रुपये |
|---|---:|
| वेतनासाठी अनुदान (हजारामध्ये) | 62,022 |
| वेतनेतर अनुदान (हजारामध्ये) | 10,000 |
| **एकूण** | **72,022** |



# वित्तीय वर्ष 2021-22 करिता शासनाकडून प्राप्त निधी



**वित्तीय वर्ष 2021-22 चा सारांश**

मानवी हक्क संरक्षण अधिनियम, 1993 नुसार महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाची स्थापना 2001 साली झाली. महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग मानवी हक्क संरक्षण अधिनियम, 1993 नुसार आणि महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग (पद्धती) नियम 2011 नुसार कार्य करतो.

पुढील तक्त्यामध्ये प्राप्त झालेल्या तक्रारी, प्रलंबित तक्रारी व निपटारा केलेल्या बाबींचा तपशील दिला आहे.

1.1.2021 ते 31.12.2021 मध्ये प्राप्त झालेल्या तक्रारी, प्रलंबित तक्रारी व निपटारा केलेल्या बाबींचा तपशील दिला आहे.

| **पूर्वीचे प्रलंबित / आरंभीची शिल्लक** | **नवीन प्राप्त / तक्रारी** | **या कालावधीत एकत्रित तक्रारी** | **वर्षभरात एकूण निपटारा** | **मदत / शिफारशीची एकूण प्रकरणे** | **या कालावधीच्या शेवटी प्रलंबित प्रकरणे** |
|---|---|---|---|---|---|
| 22381 | 2287 | 24668 | 40 | 0 | 24628 |

2021-2022 या आर्थिक वर्षासाठी शासनाकडून प्राप्त झालेला निधी

| **अनुदान** | **रुपये (हजारामध्ये)** |
|---|---|
| **वेतन** | 62,022 |
| **वेतनेतर** | 10,000 |
| **एकूण प्राप्त अनुदान** | **72,022** |

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाची 2021-2022 या वर्षातील तपशीलवार कामगिरी वार्षिक अहवालात समाविष्ट केली आहे.

18-1-2024

न्यायमूर्ती के.के. तातेड (सेवानिवृत्त)
(अध्यक्ष)

(एम.ए. सईद)
सदस्य

(भगवान डी. मोरे)
सदस्य
दि.08.04.2023 रोजी (म. नं.) सेवानिवृत्त झाले



शासकीय, मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई